जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र.9819208279

प्रेसनोट **दिनांक २८.०२.२०२५**

३५ वी महाराष्ट्र राज्य पोलीस क्रीडा स्पर्धा ठाणे २०२५

दिनांक २७/०२/२०२५ रोजी पोलीस क्रिडा संकुल, ठाणे शहर येथे पार पडलेल्या **वेट लिफ्टींग (पुरुष)** या खेळाच्या विविध वजनी गटाच्या **कोल्हापुर परिक्षेत्र** या संघाचे **चंद्रकांत सुतार, समिर काशिद** तसेच **एसआरपीएफ परिक्षेत्राचे** या संघाचे **अमोल क्षत्रिय व नाशिक परिक्षेत्राचे गणेश चौबे** यांनी प्रथम क्रमांक मिळविला आहे.

वेटलिफ्टींग (महिला) या खेळात विविध वजनी गटात **प्रशिक्षण संचालनालय** संघाच्या **कामाक्षा मुंडे, कोल्हापुर परिक्षेत्र** संघाच्या **माधवी यादव** व **कांचन टिकमकर** तसेच **मुंबई शहर** संघाच्या **वैशाली पवार, पुणे शहर व पिंपरी चिंचवड** संघाच्या **किर्ती भोसले** यांनी प्रथम क्रमांक पटकाविला आहे.

या व्यतिरिक्त **ज्युदो (पुरुष)** या खेळाच्या विविध वजनी गटात **मुंबई शहर संघाचे परमेश्वर गवळी, प्रेम पवार व अशोक नारुती, नागपूर परिक्षेत्र** या संघाचे **अंकीत सोनावणे व सुमित भूते, अमरावती परिक्षेत्र** या संघाचे **मनोज राऊत** तसेच **एसआरपीएफ परिक्षेत्राचे रोहित कदम** यांनी **प्रथम क्रमांक मिळविला आहे. ज्युदो (महिला)** विविध वजनी गटात **मुंबई शहर** या संघाच्या **अलिया अन्सारी, पुजा कुरकुडे** व **प्रियांका सनस, पुणे शहर व पिंपरी चिंचवड या संघाच्या दिपाली आवारे व विजया खुटवड** तसेच **प्रशिक्षण संचालनालय** या संघाच्या **काजल अवताडे** व **कोल्हापुर परिक्षेत्राच्या प्रज्ञा फरांदे** यांनी प्रथम क्रमांक मिळविला आहे.

ॲथलेटिक्स (महिला) ५००० मीटर धावणे पुणे व **पिंपरी चिंचवड** या संघाच्या **यामीनी ठाकरे** यांनी प्रथम क्रमांक पटकाविला आहे. **महिलांच्या ८०० मीटर धावणे** या खेळात **कोल्हापुर परिक्षेत्र** या संघाच्या **सोनाली देसाई** यांनी **प्रथम क्रमांक** मिळविला आहे.

अशा प्रकारे झालेल्या वैयक्तिक सामन्यांमध्ये विजेत्या सर्व खेळाडूंचे ठाणे पोलीस आयुक्तालयातर्फे हार्दिक अभिनंदन करण्यात येत आहे.

(शैलेश साळवी)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर